ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली
दिनांक :— ०९.०८.२०२३

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक श्री अरूण भाऊसाहेब पवार, कार्यालयीन अधीक्षक,वर्ग —२, विभागीय वन अधिकारी कार्यालय, वन विभाग,हिंगोली रा.ह.मु.श्रीकृष्णा नगर,हिंगोली यांनी ३०,०००/—रू. लाचेची मागणी करून दिनांक ०८.०८.२०२३ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान १५,०००/— (पहिला हप्ता) लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे हिंगोली शहर. जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल झाला आहे.**

---

दिनांक ०७.०८.२०२३ रोजी यातील तक्रार यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे तक्रार दिली होती की,त्यांची अर्जित रजा व परावर्तित रजा मंजुर करण्यासाठी त्यांनी रीतसर अर्ज केला असता आरोपी लोकसेवक अरूण भाऊसाहेब पवार, कार्यालयीन अधीक्षक विभागीय वनअधिकारी, कार्यालय प्रादेशिक हिंगोली यांनी ३०,०००/— रू लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर तक्रादार यांचे तक्रारीची दि.०७.०८.२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता अरूण भाऊसाहेब पवार, कार्यालयीन अधीक्षक यांनी पंचासमक्ष ३०,०००/— रू लाचेची मागणी करून तडजोडी अंती १५,०००/— रू. (पहिला हप्ता) लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाल्याने आज दिनांक ०८.०८.२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष अरूण भाऊसाहेब पवार, कार्यालयीन अधीक्षक यांनी १५०००/— रू. (पहिला हप्ता) लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरून अरूण भाऊसाहेब पवार, कार्यालयीन अधीक्षक,वनअधिकारी प्रादेशिक कार्यालय, वन विभाग, हिंगोली रा.ह.मु.श्रीकृष्णा नगर, हिंगोली मुळ राहणार चापानेर ता.कन्नड जि.संभाजीनगर यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गु.र.नं.६८५/२०२३ क.७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके यांचे मार्गदर्शना खाली, श्री.विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी श्री. प्रफुल्ल अंकुशकर, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, पोहेकॉ श्री तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींग, रविंद्र वरणे, गजानन पवार, भगवान मंडलीक, मपोना श्रीमती योगीता अवचार, पोशि श्री राजाराम फुपाटे, शिवाजी वाघ, चापोना श्री शेख अकबर अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**डॉ. राजकुमार शिंदे. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९६२३९९९९४४**
**श्री. अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८७०२२१३७९**
**टोल फ्री क.—१०६४, दुरध्वनी क.०२४५६—२२३०५५**

अनिल बा. कटके
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.